# सोलापूर महानगरपालिका,सोलापूर.

## इंद्रभुवन आंबेडकर चौक,रेल्वे लाईन्स,सोलापूर-४१३००१.

## परवाना विभाग

प्रशासकिय इमारत, तिसरा मजला. ई-मेल-foodandlicenses@gmail.com दुरध्वनी क्रः-

जा.क्र/१/आ.अ/अ.प.वि/११५ दि.१८/१०/२०२३

## परिपत्रक

सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नोंदणीकृत लॉजेस व हॉस्पिटल/रूग्णालये यांना या परिपत्रकाद्वारे कळविणेत येते की, मा. पोलिस उपायुक्त (गुन्हे/विशा) सोलापूर शहर यांनी देलेल्या पत्रानुसार मा. केंद्र शासनाच्या आदेशान्वये ज्या लॉज मध्ये मुक्कामाची सोय आहे व जेथे विदेशी नागरिक वास्तव्य करीत असतात अथवा भविष्यात वास्तव्य करणेची शक्यता आहे. अशा सर्व लॉजेसनी, तसेच अंतररूग्ण म्हणून सोय असलेल्या सर्व हॉस्पिटल्सची ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य करणेत आलेली आहे.

सोलापूर शहरातील विविध लॉजेस मध्ये वास्तव्यास असलेल्या व विविध हॉस्पिटल्समध्ये अंतररूग्ण म्हणून दाखल झालेल्या विदेशी नागरिकांची माहिती २४ तासाच्या आत सी फॉर्मद्वारे ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे. त्या करीता सोलापूर शहरातील सर्व लॉजेस व हॉस्पिटल्सना त्यांच्या लॉजची/हॉस्पिटलची पोलिस आयुक्तालय, सोलापूर शहर कडे नोंदणीकरणे आवश्यक आहे. सदरची नोंदणी करणेकरीता संबंधित लॉज/हॉस्पिटलचे मालक / व्यवस्थापक यांनी त्यांच्या लॉज/हॉस्पिटलची माहिती www.indianfrro.gov.in/frro/FromC या वेबसाईट वरून USER REGISTRATION फॉर्म ऑनलाईन भरणे बंधनकारक आहे.

त्याचप्रमाणे आपल्या परवान्याचे/नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण करताना किंवा नवीन परवाना मागणी करताना विदेशी नागरिकांची सी फॉर्म रजिस्ट्रेशन केल्याचे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच ज्या लॉज/हॉस्पिटल धारकांना ऑनलाईन नोंदणी बाबतची अधिक माहिती हवी असल्यास पोलिस आयुक्तालय सोलापूर शहर येथील पासपोर्ट शाखेमध्ये कार्यालीन वेळेत संपर्क साधून माहिती घेणेत यावी याची नोंद घेणेत यावी.

डॉ. बसवराज लोहारे
आरोग्याधिकारी
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर